Shivaji College Hingoli Dist. Hingoli

# उच्च शिक्षणातील संशोधन पध्दती

संपादक

डॉ. नविन केशव सोळंके

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli, Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

Shivaji College
Dist Hingoli

ISBN : 978-81-945997-8-4

• **उच्च शिक्षणातील संशोधन पध्दती**

डॉ. नवीन केशव सोळंके

© सुरक्षित

• **प्रकाशन क्रमांक 3151**

• **प्रकाशक**

ग्लोबल पब्लिकेशन

एल.आय.सी. कॉलनी, लातूर,

ता. जि. लातूर - 413531.

• **अक्षर जुळवणी**

श्री. विकास ढमाले, श्री. अनंत कोटीवाले

• **मुखपृष्ठ**

श्री. विकास ढमाले

• **मुद्रक**

इंडोव्हिजन ऑफसेट प्रिंटींग ॲन्ड बायडिंग,

एल.आय.सी. कॉलनी, लातूर, जि. लातूर

• **प्रथमावृत्ती : 26 जानेवारी 2021**

• **मुल्य 350/-**

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र | विवरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १० | भाषा आणि संशोधन : एक अभ्यास<br>**डॉ. सुनिल कांबळे** | ६१ |
| ११ | राज्यशास्त्रातील संशोधन पध्दती<br>**डॉ. एस. यु. ढाले** | ७४ |
| १२ | संशोधनात उपकल्पना किंवा गृहितकाचे महत्व<br>**डॉ. कल्याण कदम** | ८१ |
| १३ | सामाजिक संशोधनामध्ये साहित्यांच्या पुनरावलोकनाचे महत्व<br>**के.जे. खंदारे** | ८६ |



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli


Scanned with OKEN Scanner

Shivaji College Hingoli Dist. Hingoli



## प्रकरण ११

# राज्यशास्त्रातील संशोधन पध्दती

**डॉ. एस. यु. ढाले**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय,
हिंगोली, जि. हिंगोली

**प्रास्ताविक :**

संशोधन ही राष्ट्राला समृध्द करणारी कृती आहे या मुळे देशातील नागरिकांच्या समस्या व उनिवा सुधार करणारी राष्ट्रीय कृती म्हणून संशोधनाचे महत्त्व अधिक आहे. यासाठीच सामाजिक विद्याशाखे अंतर्गत संशोधन विकसित होण्याकरिता उच्च शिक्षणात प्रयत्न होतांना आढळतो.संशोधनास इंग्रजीत research असे म्हणतात. To Research म्हणजे शोधून काढणे, म्हणजे पुन्हा पुन्हा तपासून शोधून सत्य काढणे असे होय. राजकीय वा सामाजिक संशोधनात अभ्यास विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन एकसारखा असत नाही. दृष्टिकोनात जसा बदल होतो तसा उदिष्टांतही बदल संभवतो तद्वतच संशोधन तंत्रात, अभ्यासपध्दतीत आवश्यक तो बदल करावचा लागतो. राजकीय करावा. संशोधकास समसजाव्यवस्थेतील विभिन्न क्षेत्रातील लोकांच्या बरोबर प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे संपर्क साधुन लेखी अथवा तोंडी स्वरुपात माहिती घ्यावी लागते हे करतांना ज्या साधन वा मार्गाचा अवलंब केला जातो त्यास संशोधन तंत्र ही संज्ञा वापरली जाते.

संशोधन करत असताना विविध समस्येला सामोरे जावे लागते जस प्रश्नावली, मुलाखती, सर्वेक्षण इ. माध्यमाने माहिती मिळवतांना लोक ज्या पध्दतीने उत्तरे, माहिती सांगतील ती नोंदवून संशोधकास निष्कर्ष काढावा लागतो. तरीही आपले संशोधन दर्जेदार व्हावे हीच अपेक्षा संशोधक कडुन असते.

**वेवस्टर :**



कोणत्याही विषयातील नवीन तत्वे व तथ्ये शोधुन काढण्यासाठी व जूनी तत्वाचे परिक्षण करण्यासाठी केलेला चिकित्यकव पध्दतीशिर अभ्यास म्हणजे संशोधन होय.

**मोझर :**

सामाजिक घटना व सामाजिक समस्या यांच्या बाबत नवीन ज्ञान प्राप्त करुन घेण्याच्या उदेशाने केलेला कृमबध्द प्रयत्न म्हणजे संशोधन होय.

**राजकीय संशोधनाची वैशिष्टये :**

**१. संकल्पनांचा व्यवस्थीत पणे अभ्यास करणे :**

प्रचलीत समाजामध्ये विविध स्वरुपाच्या संकल्पना रुढ झालेल्या आहेत त्यांना समाजाची सामूहीक माण्यता प्राप्त झालेली असते. अशा संकल्पना मुर्त वा अमुर्त स्वरुपाच्या असतात. याला धार्मिक भावना, श्रध्दा, सास्कृतिक चालीरिती अंधश्रद्धा व परंपरा, ऐतिहासिक घटना कारनीभूत असतात म्हणुन या संकल्पना कितपत सत्य, असत्य, आहेत हे शास्त्रीयतेच्या अधारे तपासुन पाहणे व समाजपयोगी उपयुक्तता दाखवणे अभ्यासकाचे कर्तव्य आहे.

**२. प्रतिके, साधनाची शास्त्रीत पध्दतीने हाताळणी :**

नैसर्गीक शास्त्रात एखाद्या घटनेची सत्यता तपासुन पाहण्यासाठी वस्तुची वा प्रतिकांची किंवा एखाद्या सजीव घटकाची जाणीवपूर्वक शास्त्रीय पध्दतीने हाताळणी केली जाते. कोणत्याही शास्त्राचा अधार उपयोजित असल्यामुळे मानवी जीवनातील समस्या,अडचणीसोडवणे, त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविणे यातून माणवी जीवन समृध्द व संपन्न करने हे संशोधकाचे कर्तव्य असते.

**३. ज्ञानाची कक्षा वाढवणे व प्रमाणित करणे :**

शास्त्र ही कोणत्याही एका विषयाची वा ज्ञानची मक्तेदारी होत नाही. मानवा सभोवतालचे विश्व व माणवाला आलेले दैनंदिन जीवनातील बरेवाईट अनुभव ही ज्ञानाची केंद्रे माणली जातात.

राज्यशास्त्रात जेवढे अधिक संशोधन होत जाईल तेवढया ज्ञान शाखा उदयास येतील उदा. अल्यपंसख्यकाचे राजकारण, धर्माचे राजकारण व प्रशासन शास्त्राचे राजकारण इ. ज्ञानसारखा पुढे येतील. मिळवलेले ज्ञानाचा प्रचार व प्रसार करणे संशोधनाचे उदिष्ट्य राहील.

PRINCIPAL
Shivaji College
Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

Shivaji College Hingoli Dist. Hingoli



४. सिध्दांताची निर्मिती करणे :

राजकीय संशोधनाचे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे सिध्दांताची निर्मिती करणे होय. ज्ञानासाठी व प्रगती साठी ज्ञान मिळवण्याचा उदेश संशोधनाचा असतो. प्रचलित समस्येतून मानवाची सुटका करण्यासाठी सिध्दांताची निर्मिती करावी लागते. हे सिध्दांत जीवनाच्या गुढतेवर उकल करतात. अलिकडे मात्र राजकीय संशोधनात सिध्दांतापेक्षा निष्कर्षाचे व अनुमानाचेच प्रमाण जास्त आढळते.

५. उपयोजीत ज्ञान मिळवण्यावर भर देणे :

ज्ञान मिळवणे, प्रसार करने, संचय करने, व दैनंदीन जीवनात वापर करणे मानवाचे प्रमुख लक्षण होय. नैसर्गीक शास्त्रात लागलेल्या अनेक शोधामुळे उपकरणे,औषधे, व भौतिक साधनाचा उपयोग होऊ लागला. राजकीय समाज व राष्टीय विकासात संशोधपनाचे महत्त्व अग्रस्थानी आहे. म्हणुन ते होणे आवश्यक आहे, असे म्हणता येईल.

६. राजकीय जीवनाच्या घडामोडीच्या अभ्यास करणे :

मानवी जीवनात राजकीय घटनांचा संदर्भ अर्थव्यवस्था, समाजीक, संबंघाशी निगडीत असल्याने त्याचा निरंतर अभ्यास करण्याची गरज असते. प्रत्येक देशाची राज्यघटना,शासन,प्रशासन निवडणुका इ. घटकांच्या सामाजिक जीवनावर जो परिणाम होतो त्या घटनांकडे शास्त्रीय पध्दतीने विश्लेषण करण्याचा भर अभ्यासाकाकडे असावा लागतो. यामुळे मानवी जीवन अधिक सुकर होईल.

७. जुन्या तथ्याचे परिक्षण व नविन तथ्याचा शोध घेणे :

बदलत्या काळ व परिस्थितीशी निगडीत संशोधन होणे महत्वाचे आहे. संशोधानात जुने संदर्भ तपासुन नवीन संदर्भाची सांगड घालणे अपेक्षीत असते. या दोन्ही समन्वयातून उपयोजीत संशोधन होण्यास मदत होते.

८. सांख्यीकी विश्लेषणावर भर देणे :

सामाजिक शास्त्राच्या संशोधन पद्धतीत संस्था शास्त्राला मोठे महत्व प्राप्त झाले आहे. संशोधकाने गोळा केलेली माहिती व्यवस्यीकपणे मांडण्यासाठी अलीकडे संख्याशास्त्राचा आधार घेतला जातोय. तक्ते करणे, त्याचे प्रमाण काढणे इ. घटकांसाठी संशोधनात संख्याकीय विश्लेषण वर भर देणे गरजेचे



ठरते. या पद्धतीमुळे अचुक व संतोलित संशोधन होण्यास मदत होते.

राजकीय संशोधनातील समस्या :

वरील प्रमाणे राजकीय संशोधनाची वैशिष्टये अभ्यासल्यानंतर संशोधकास विविध समस्या व अडचणींना सामोरे जावे लागते. त्या समस्या पुढील प्रमाणे आहेत.

१. राजकीय घडामोडींचे बदल व क्लिष्टता :

गतीशिलता हे या राजकीय घडामोडीचे एक प्रमुख लक्षण मानले जाते. ह्या घटना मुख्यत: मानवाच्या राजकीय वर्तनातून, राजकीय कृतीतून व राजकीय प्रवृतीतून आकार घेत असतात. वेगवेगळ्या घडतात. राजकीय समाज कधीच स्थीर असत नाही.

घटना घडामोडींच्या बदलामूळे क्लिष्टता वाढत जाते. कोणत्याही राजकीय घटना घडल्यामुळे त्याला इतरही जसे आर्थिक, सामाजिक, भुतकालीन, धार्मिक ही घटक कारणीभूत ठरतात. हे काम करणे अभ्यासासाठी कठीण आहे.

२. माहिती गोळा करतांना येणाऱ्या अडचणी :

संशोधनकाला अभ्यास विषया संदर्भात वस्तुनिष्ठ स्वरुपाची माहिती गोळा करण्याकडे भर द्यावा लागतो. ही माहिती संदर्भ ग्रंथ, ऐतिहासिक कागद पत्रे, व इतर दस्ताऐवजातून घेत असतो. याला दुय्यम स्त्रोत म्हटले जाते. आणि संशोधक दर्जेदार संशोधन करण्याच्या भूमीकेने माहिती लोकांच्या मुलाखती घेवून गोळा करतो. घटनेच्या वा समस्येच्या संदर्भात लोकांच्या प्रतिक्रिया जाणुन घेण्यावर अभ्यासकाला भर द्यावा लागतो. यात लोकांकडुन मिळालेली माहिती कितपत सत्य असत्य आहे, हे पडताळून पाहणे अभ्यासकाला औघड जाते.

३. माहितीचे विश्लेषण करण्यातील अडचणी :

लोकांकडून मिळालेली माहिती ही शाब्दिक, मौखिक स्वरुपात असल्यामुळे विशिष्ट गुणधर्मानुसार त्या महितीचे विश्लेषण अनेक रकान्यात वा कोस्टकात अभ्यासकाला मांडावे लागते. राजकीय संशोधकाला संशोधन महितीचे विश्लेषण कोणत्या पद्धतीने करावे या बाबत कोणत्याच पद्धतीचे निकर्ष निर्धारीत केलेले नसल्यामुळे ही अडचण समोर येते.

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

आधुनिक काळात माहितीचे विश्लेषण करते वेळी संख्याशास्त्राचा अवलंब करावा अशी अपेक्षा व्यक्त केल्या जातात. परंतु शाब्दीक स्वरुपाच्या माहितीचे संख्याशास्त्रात रुपांतर करतेवेळी गणि शास्तातील अनेक सूत्र पद्धतीचा व आकडे मोडीचा अवलंब अभ्यासकाला करणे कठीण जाते.

**४. व्यक्ती निष्ठेचा प्रभाव पडतो :**

राजकीय संशोधकासमोर आणखी एक अडचण म्हणजे वस्तुनिष्ठे पेक्षा व्यक्तीनिष्ठेचा वाढत जाणारा प्रभाव होय. वस्तुनिष्ठा संशोधनातील मूलभूत निकर्ष मानला जातो. यात याचे प्रमाण कमी आहे. घटनेच्या संदर्भात ज्याविधानाची मांडणी करावयाची आहे, ते विधान अन्य अभ्यासकाला पटण्यासारखे नसते. तरीपण अभ्यासक आपले मत शास्त्रीय आहे हे ठासून सांगण्याचा प्रयत्न करतो. म्हणून व्यक्ती निष्ठा हा राजकीय संशोधनाचा दोष मानला जातो.

**५. भविष्यकालीन अंदाज बांधण्यात येणरी अडचण :**

राजकीय घटना सातत्याने घडत असल्यातरी यात सर्वच घटना वारंवार घटत नसतात. यात काही घटना वारंवार घडत असतात. तरीपण ह्या घटना एकाच पद्धतीने, एकाच वेगाने व एकाच दिशेने घडत नाहीत त्यात वारंवार बदल संभवतात म्हणून अभ्यासकाने काढलेला निष्कर्ष भविष्य कालीन राजकीय घडामोडीला लागू करणे.

**६. संशोधकास तटस्थ राहण्यात येणारे अडथळे :**

राजकीय समाज व्यवस्थेत वेगवेगळे वैचारिक संप्रदाय अस्तित्वात असतात. संशोधन हा देखील कोणत्या ना कोणत्या धार्मिक, सांस्कृतिक, वांशिक व जातीय समुदायाचा सदस्य असतो. याचा प्रभाव, संप्रदायाचा प्रभाव संशोधकावर पडतो. बाल्यअवस्थे पासूनच या साहित्यात असल्याने पूर्णतः तटस्थ राहणे अत्यंत कमी घटते. यावरुन संशोधनात तटस्थेतेच्या घटकाकडे दुर्लक्ष होते.

संशोधक विविध समुदायाच्या दडपणाला बळी [illegible] निःपक्षपाती व निर्भड संशोधनात अडचणी येतात. थोडक्यात राजकीय संशोधकाजवळ तटस्थवृत्ती आवश्यक आहे.

**७. प्रश्नावली संदर्भात येणारे अडचणी**



मुलाखतिद्वारे आवश्यक ती माहिती समाजातील विविध स्तरातील लोकांकडून मिळवली जाते. परंतु त्या प्रश्नांची वाक्य रचना कोणतया प्रकारची आहे. हे सर्व घटक लक्षात घेवूनच उतरदाता लिखित स्वरुपाची उत्तरे देण्याचा प्रयत्न करतो. त्यातून मोकळेपणाने प्रश्नांची उत्तरे दिली जात नाहीत.

**८. शास्त्रीय अभ्यास वाढवणे आवश्यक :**

जिवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा बुद्धवादी व तर्कशुद्ध असेल तर शास्त्रीयता जोपासली जाते पण ही दृष्टी प्रत्यक अभ्यासकाजवळ असतेच असे नाही. आपल्या खाजगी अथवा कौटुंबीक जीवनात जो अभ्यासक परंपरेचे अनुकरण करतो तो अशा परंपरेस विरोध करत नाही. जिज्ञासूवृती व चिकित्सकपणा अभ्यासकाजवळ असावा लागतो. केवळ उच्च पदवी संपादन करण्याइतपत पात्रता संशोधकाजवळ संशोधन वृत्ती असून भागत नाही.

**सारांश :**

संशोधन ही मानवी पुर्ततेसाठीची गरज आहे. म्हणून ती संदोदीत चालत आली पाहीजे. राज्यशास्त्रातील संशोधनाने उत्कृष्ट शासन, आदर्श नागरीक व दोहीतील परस्पर संबंधाची वाढ होत असते. सशोधनासाठी काही मर्यादा असल्यातरी त्यावर मात करुन पुढे जाणारे संशोधनही होने महत्वाचे आहे. म्हणून मानवी अस्तित्व आणि स्वंयपूर्ण जीवनासाठी संशोधनाची वृद्धी होणे प्रगत समाजाच्या हिताचे आहे.

राजकीय संशोधन वाढीमूळे आत्मीक आनंद होते. तसेच अंधश्रद्धा सारख्या अनिष्ठ प्रथेचे निर्मूलन होण्यास मदत होते. भारताच्या प्रगतीमध्ये संशोधन कृती नियोजीत विकास साध्याची हमी देते. तसेच प्रचलित काळात [illegible] समस्यांचंचे निर्मूलन होते. यासाठीच राजकीय संशोधनाचे मानवी जीवनात महत्व आहे. जिज्ञासा ही सर्वज्ञानाची जननी आहे. असे ज्ञान मिळवण्याचा [illegible] होय.

संदर्भ सूची :-

[illegible]

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner